# क्षयरोग

## फार्मसीमध्ये खोकल्याचे व्यवस्थापन करताना...

### सक्रिय क्षयरोगाची (टीबी) इतर लक्षणे

- ताप
- वजन कमी होणे
- खोकल्यात रक्त
- भूक न लागणे
- रात्री घाम येणे
- थकवा

### करा

- खोकला असलेल्या सर्व व्यक्तींना खोकल्याचा कालावधी आणि इतर लक्षणांबद्दल विचारा.
- खोकला 2 आठवडे किंवा त्याहून अधिक काळ टिकून राहिल्यास टीबी असू शकतो, असे समजा.
- अशा व्यक्तींना टीबी चाचणीसाठी जवळच्या आरोग्य सुविधा केंद्रावर किंवा पात्र खाजगी प्रदात्यांकडे पाठवा.

### करू नका

- फ्लोरोक्विनोलॉन्स (उदा. सिप्रोफ्लोक्सासिन, लेव्होफ्लोक्सासिन) सारखी प्रतिजैविके किंवा स्टिरॉइड्स (उदा. डेक्सामेथासोन, बीटामेथासोन) वैध प्रिस्क्रिप्शनशिवाय वितरित करू नका.
- टीबीविरोधी औषधे, जसे रिफॅम्पिसिन, एथाम्बुटोल, आयसोनियाझिड, पायराझिनामाइड ही वैध प्रिस्क्रिप्शनशिवाय वितरित करू नका.

### लक्षणांपासून आराम

पॅरासिटामॉल आणि खोकल्यासाठीची उत्पादने यांच्यासारखी ओटीसी औषधे प्रिस्क्रिप्शनशिवाय वितरित करणे ठीक आहे. (खोकला शमन करणारी / दाबून टाकणारी औषधे यातून वगळावीत, कारण ती लक्षणे लपवू शकतात आणि हे टाळले पाहिजे.)

## ४.१ दशलक्ष

जगभर, इतक्या संख्येने टीबी संक्रमित व्यक्ती नोंदींतून गायब आहेत

यासाठी, फार्मासिस्ट हे सामान्यत: प्रथम संपर्कबिंदू आहेत आणि याविषयावर संवाद साधण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका आहे.

TB•PPM Learning Network
Quality TB care for all people by all providers

Supported by
fip ADVANCING PHARMACY WORLDWIDE